# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com
फोन क्रमांक - 07172-250659

क्रं.कावि/आ.व्य/कोरोना विषाणु/2020/ 555
दिनांक :- 08 जुन, 2020

**संदर्भ :-**
1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,कलम 34 (C) 34 (M)
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनिमय 1897,
3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांची दि.13 मार्च,2020 ची अधिसूचना
4. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र.40-3/2020-DM-I(A) दि.01.05.2020
5. महाराष्ट्र शासन महुसल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020
6. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र.40-3/2020-DM-I(A) दि.17.05.2020, दि. 30.05.2020.
7. महाराष्ट्र शासन महुसल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि.17.05.2020 व दि. 19.05.2020 व दि. 31.05.2020.
8. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, ब्रम्हपुरी यांचे प्रस्ताव क्रं.कावि/आ.व्य/को-वि/2020/ 1610 दिनांक 07.06.2020.

## -: आदेश :-

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 13 मार्च, 2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2, 3, व 4, ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासुन लागू करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी केंद्र शासन व राज्य शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन दिनांक 30 जुन, 2020 पावेतो संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन लागू राहील असा आदेश करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी **मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी** या भागात कोरोना बाधीत रुग्ण आढळून आल्याने व त्यांचा प्रादुर्भाव इतर भागात पसरु नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच प्रभागातील नागरीकांचे हित व सुरक्षेस्तव अधिकची उपाय योजना तातडीने करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी भारत सरकार आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी Novel Coronavirus Disease 2019 (COVID-19) बाबत Containment Plan निर्धारित केला असून त्यानुसार कोरोना विषाणुव्दारे बाधीत व्यक्ती/ समुदायच्या केंद्रबिंदु परिसरापर्यंत नागरीकांची हालचाल/फिरणे/संपर्क यावर निर्बंध घालून मज्जाव करणेबाबत निर्देशीत केले आहे.

त्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनिमय 2005 च्या कलम 34 (C) व 34 (M) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) व 144 (3) अंतर्गत **मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी** येथील इतर भागात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टीने सदर भागाच्या सिमा बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी **मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी** येथील इतर भागात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टीने खालीलप्रमाणे Action Plan For Cluster Containment निर्धारित करण्यात येत आहे. तसेच **मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी** येथील खालील प्रमाणे परिघीय क्षेत्राच्या सिमा पुढील आदेशापावेतो बंद करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

❖ **Containment Zone :- मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी पुर्ण गाव**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | दुधवाही या गावाची पुर्वेकडील हद्द. |
| पश्चिमेकडे | :- | किरमीटी या गावाची पश्चिमेकडील हद्द. |
| उत्तरेकडे | :- | अडयाळ टेकळी गोसीखुर्द कॉलनी जवळील हद्द. |
| दक्षिणेकडे | :- | भगवानपुर या गावाची दक्षिणेकडील हद्द. |

वरील नमुद क्षेत्रात CONTAINMENT PLAN नुसार कार्यवाही करणेबाबत आदेशीत करण्यात येत आहे. सदर आदेशाची प्रसिध्दी देण्यासंबंधाने संबधित **पोलीस स्टेशन अधिकारी आणि तहसिलदार, ब्रम्हपुरी** यांनी कार्यवाही करावी.

सदर मनाई हुकुम आदेशाचे कालावधीत उपरोक्त क्षेत्रात पुर्वपरवानगी शिवाय कोणतेही आवागमनास परवानगी असणार नाही ही पुर्व परवानगी आवश्यक सेवा पुरविणा-या पास धारकांना सुध्दा लागु राहील.

चंद्रपूर जिल्हयातील **मौजा अडयाळ तुकूम ता. ब्रम्हपुरी** या क्षेत्रात शासकीय कर्तव्यावर असलेले अधिकारी/कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवेस्तव कर्तव्य करण्याची आवश्यकता, तातडीचे वैद्यकीय कारणे तसेच अत्यंविधी, वैद्यकीय सेवेशी संबधीत खाजगी डॉक्टर, नर्स, मेडीकल स्टोअर्स दुकानदार, पॅथॉलोजिस्ट, रुग्णवाहिका यांना मुभा राहील. तसेच **तहसिलदार, ब्रम्हपुरी** यांचेकडून सदर प्रतिबंधीत क्षेत्रात अत्यावश्यक सेवा पुरवठाधारकांना परवाना/पासेस निर्गमित करण्यात यावे आणि सदरहु परवाना/पासेस धारकांची यादी संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांना तात्काळ दयावी. सदरहु परवाना/पासेस धारकांना आवश्यक सेवा पोलीस स्टेशन अधिकारी यांनी नेमुण दिलेल्या दिलेल्या ठराविक वेळेत **सकाळी 09.00 ते दुपारी 02.00** या कालावधीत पुरविण्याची मुभा राहील. तसेच सदरहु अत्यावश्यक सेवा पुरवठा करतांना सामाजिक अंतर

(Social Distancing) चे व इतर आरोग्य विषयक नियमांचे पालन करण्याची जबाबदारी **तहसिलदार, ब्रम्हपुरी** यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांचे मार्फत करावी.

जे वरील आदेशांचे उल्लंघन करतील त्यांचेवर आपत्ती व्यवस्थापन अधिनिमय 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144, भारतीय दंड संहिता,1960 चे कलम 188 व इतर संबधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

(डॉ.कुणाल खेमनार)
**जिल्हादंडाधिकारी,**
**चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
4. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
5. उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी
6. उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपुरी
7. तहसिलदार, ब्रम्हपुरी
8. संवर्ग विकास अधिकारी, पं.स. ब्रम्हपुरी

**जिल्हादंडाधिकारी,**
**चंद्रपूर**